Govt. Letter- 7

25

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

आस्थापना विभाग

पत्ता:- छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, १ ला माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर
email- mconagpur@gmail.com
(फोन नं. २५६७०३२)

दि. २३/०९/२०२५

क्रमांक :- ५२७ / आस्थापना

नगर विकास विभाग
C... D.
29 SEP 2025

प्रति,

मा. प्रधान सचिव,
नगर विकास विभाग, (नवि-२)
मंत्रालय, मुंबई -४०००३२

**विषय :-** मंजूर आकृतीबंधानुसार नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "सहायक आयुक्त" या पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविण्याबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्र.२४०/आस्थापना, दि.३०/०८/२०२४

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, नागपूर महानगरपालिकेच्या मंजुर आकृतीबंधात "सहायक आयुक्त" सातवे वेतन आयोगानुसार वेतनमान (रू. ५७१००-१७७५००) या संवर्गाची एकुण २२ पदे मंजुर असुन सरळसेवा/ प्रतिनियुक्तीचे ११ पदे व पदोन्नतीने ११ पदे आहेत यापैकी ०२ अधिकारी कार्यरत असुन प्रतिनियुक्तीने एकही अधिकारी कार्यरत नाही.

नागपूर महानगरपालिकेत १० क्षेत्रिय कार्यालय तसेच मुख्यालयात सामान्य प्रशासन विभाग, मालमत्ता विभाग, कर विभाग, अतिक्रमण विभाग इत्यादी महत्वाचे विभाग असून, नागपूर महानगरपालिकच्या आस्थापनेवर केवळ ०२ सहायक आयुक्त कार्यरत आहेत. नागपूर महानगरपालिकेचा कामाचा वाढता व्याप व शहराची वाढती लोकसंख्या तसेच विकासविषयक कामात झालेली वाढ लक्षात घेता, शासनाने मंजुर केलेल्या शासन निर्णय क्र नामपा-१२२३/प्र.क्र.७७/नवि-२६, मंत्रालय मुंबई दि.०८ सप्टेंबर २०२३ नुसार मंजूर पदांवर पूर्णवेळ अधिकारी कार्यरत असणे आवश्यक आहे.

तसेच सार्वत्रिक निवडणुक - २०२५ अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोग व शासनाचे वेळोवेळी प्राप्त निर्देशान्वये पुढील टप्प्यात प्रभाग निहाय मतदार यादीचे विभाजन करणे, मतदान केंद्र निश्चित करून आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे त्याचप्रमाणे क्षेत्रिय कार्यालय स्तरावर प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रीया पूर्ण करणे इत्यादी निवडणूक विषयक कामे कालबध्द पध्दतीने व प्राधान्याने पूर्ण करण्याकरिता सहायक आयुक्त संवर्गातील रिक्त २० पदांपैकी कमीत कमी ११ पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत आपणास विनंती आहे.

डॉ. अभिजीत चौधरी (भाप्रसे)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका नागपूर

**प्रतिलीपी :-** मा.राज्य निवडणुक आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई

सत्यमेव जयते

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

अ. शा. पत्र क्र. :- २८० /आस्थापना/२०२४
कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
पत्ता :- नवीन प्रशासकीय इमारत,
सिव्हील लाईन्स, नागपूर.
दूरध्वनी क्रमांक :- ०७१२- २५६७९००
ईमेल :- mconagpur@gmail.com
दिनांक :- 30 /08 /२०२४

डॉ. अभिजीत चौधरी,
आयुक्त तथा प्रशासक,
महानगरपालिका, नागपूर

**विषय :- नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासन द्वारा प्रतिनियुक्तीचे पदावर अधिकारी पाठविणेबाबत.**

**संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र. १४४/आस्थापना, दि.१५/०६/२०२३**
**२) या कार्यालयाचे पत्र क्र. १४७/आस्थापना, दि.१५/०६/२०२३**
**३) या कार्यालयाचे पत्र क्र. उपायुक्त (साप्रवि)/११६/२०२३, दि.१५/०६/२०२३**
**४) या कार्यालयाचे पत्र क्र. उपायुक्त (साप्रवि)/११७/२०२३, दि.१५/०६/२०२३**
**५) या कार्यालयाचे पत्र क्र. उपायुक्त (साप्रवि)/११८/२०२३, दि.१५/०६/२०२३**
**६) या कार्यालयाचे पत्र क्र. २६४/आस्थापना, दि.२१/०८/२०२३**
**७) या कार्यालयाचे पत्र क्र. २८५/आस्थापना, दि.३०/०८/२०२३**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, नागपूर महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीच्या पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविणेबाबत संदर्भीय पत्रान्वये आपणांस विनंती करण्यात आलेली आहे.

नागपूर महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीचे पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत. वाढती लोकसंख्या तसेच नागपूर महानगरपालिका क्षेत्रात करावयाची विविध विकास कामे तसेच त्या अनुषंगाने शहर विकास आराखडया अंतर्गत मुलभूत नागरी सुविधा उपलब्धता करून देणे अशी प्रशासकीय व तांत्रिक कामे जलद गतीने राबविणे हेतू नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील किमान खालील पदांवर शासनाद्वारा पूर्ण वेळ प्रतिनियुक्तीने अधिकारी उपलब्ध होणे गरजेचे आहे.

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | एकुण मंजूर पदसंख्या | शासनाने सरळ सेवेने / प्रतिनियुक्तीने भरावयाची पदसंख्या | सद्य:स्थितीत शासनाने प्रतिनियुक्तीवर पाठविलेली पदसंख्या | शासन निर्णय | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शहर अभियंता | १ | १ | ० | नागपूर महानगरपालिकेतील मंजूर आकृतीबंध शासन निर्णय दि. १० मे, २०२३ नुसार मंजूर पद. | मंजूर आकृतीबंधानुसार सद्य:स्थितीत शहर अभियंता हे पद शासन स्तरावरून भरणे विनंती आहे. |
| २ | उपसंचालक नगर रचना | १ | १ | ० | | मंजूर आकृतीबंधानुसार सद्य:स्थितीत उपसंचालक, नगर रचना या पदावर श्री. प्र.भा. गावंडे हे कार्यरत असून, ते नियतवयोमानानुसार दि. ३१/०८/२०२४ रोजी सेवेतून सेवानिवृत्त होत असल्याने, सबब तुर्तास अधिकारी उपलब्ध होणेस विनंती आहे. |
| ३ | उपायुक्त | ७ | ३ | ० | | सद्य:स्थितीत प्रतिनियुक्तीचे ३ पद रिक्त असल्याने हे पद शासन स्तरावरून भरणेस विनंती आहे. कार्यालयीन पत्र क्र. १४४/आस्थापना, दि. १५/०६/२०२३ अन्वये उपायुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविण्यास विनंती करण्यात आलेली आहे. सबब तुर्तास अधिकारी उपलब्ध होणेस विनंती आहे. |

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | एकूण मंजूर पदसंख्या | शासनाने सरळ सेवेने / प्रतिनियुक्तीने भरावयाची पदसंख्या | सद्य:स्थितीत शासनाने प्रतिनियुक्तीवर पाठविलेली पदसंख्या | शासन निर्णय | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | उप वैद्यकीय आरोग्य अधिकारी | १ | १ | ० | | मंजूर आकृतीबंधानुसार हे एक पद मंजूर असून, प्रतिनियुक्तीने भरणेस विनंती आहे. |
| ५ | सहा. संचालक नगर रचना | १ | १ | ० | | महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग दि. १४ ऑगस्ट, २०२४ अन्वये सहायक संचालक, नगर रचना या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. ऋतुराज जाधव, नगर रचनाकार यांचेकडे अतिरिक्त स्वरूपात सोपविण्यात आलेला आहे. |
| ६ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | २८ | ८ | २ | | मंजूर आकृतीबंधानुसार कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाचे २८ पद मंजूर असून, प्रतिनियुक्तीचे ८ पदे भरण्याची तरतूद आहे. सद्य:स्थितीत प्रतिनियुक्तीने २ पदावर अधिकारी कार्यरत आहेत. प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविण्यात विनंती करण्यात येत आहे. |
| ७ | भूमी स्थावर अधिकारी | १ | १ | ० | | मंजूर आकृतीबंधानुसार हे एक पद मंजूर असून, प्रतिनियुक्तीने भरणेस विनंती आहे. |
| ८ | मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक | १ | १ | ० | | मंजूर आकृतीबंधानुसार हे एक पद मंजूर असून, प्रतिनियुक्तीने भरणेस विनंती आहे. |
| ९ | सहायक आयुक्त | ११ | १० | १ | | मंजूर आकृतीबंधानुसार सहायक आयुक्त या पदाचे एकूण मंजूर पदे २२ असून, पदोन्नतीने ५०% व सरळ सेवेने / प्रतिनियुक्तीने ५०% भरण्याची तरतूद आहे. सरळ सेवेने/ प्रतिनियुक्तीने ११ पदे मंजूर असून, सद्य:स्थितीत १ पदावर अधिकारी कार्यरत आहेत. प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविण्यात विनंती करण्यात येत आहे. |

करिता उक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत पदावर प्रतिनियुक्तीने तातडीने अधिकारी पाठविण्यास विनंती आहे.

आपला ..................

डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका नागपूर

प्रति,

मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग-२,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -४०००३२